# दि कल्याण जनता सहकारी बँक लि.झालेल्या निवडणूका

- श्री. वा. द. साठे

माजी संस्थापक संचालक

सामान्य माणसांचे कुटुंबातील आर्थिक प्रश्न सोडवून त्यांचा आर्थिक स्थर उंचावणे व गरीबी नष्ट करुन त्यांचे जीवन सुखी करणे ह्या कल्पनेने रा.स्व. संघाच्या ठाणे जिल्ह्यातील प्रमुख कार्यकर्त्यांमध्ये सहकारी बँकेचा विचार सुरू झाला. संघ स्वयंसेवकामधील प्रामाणिकपणा, कर्तृत्व, संघटनकौशल्य, समर्पित भावना. ध्येयवाद, नेतृत्व, निस्पृहता ह्या गुणांचा आर्थिक क्षेत्रात उपयोग करणे ह्याची आवश्यकता वाटली म्हणून रा. स्व. संघाच्या प्रेरणेनी ठाणे जिल्ह्यात १९७० ते १९७३ दरम्यान ठाणे जनता, डोंबिवली नागरीक, वसई जनता व कल्याण जनता बँकांची स्थापना झाली.

सहकरी बँक सुरू करण्यासाठी त्यावेळी रु. ५० हजारांचे भाग भांडवल जमा करणे आवश्यक होते. आपले कल्याण हे तसे कनिष्ठ व मध्यम वर्गातले म्हणजे बाबू लोकांचे गाव. लोकांकडून रु. १०० गोळा करणे हे सुध्दा त्यावेळी कठीण होते. त्यात आणिक वाईट गोष्ट म्हणजे त्यावेळी कल्याणात असलेली दि कल्याण पीपल्स को. ऑप. बँक ही जुनी सहकारी बँक बुडण्याच्या मार्गावर होती. त्याची तोशीश (व्यवहार बंद होते) अनेक जणांना त्यावेळी झाली होती. ही बँक टिळक चौकात असल्यामुळे अनेकांची तोंडे भाजली होती. अशा परिस्थितीत नवीन सहकारी बँक काढणे कठिणच होते. परंतु कल्याणच्या कार्यकर्त्यांनी जिद्दीनी रु. ५० हजार जमा केले आणि हे शिवधनुष्य उचलण्याचे धाडस करुन हा सहकाराचा जळता निखारा पदरात घेतला.

त्यावेळी सहकारी बँकांना परवाना सहकारी खात्यांमार्फत मिळत असे तोपर्यंत ह्या क्षेत्रावर रिझर्व्ह बँकेचे नियंत्रण आतासारखे नव्हते. कार्यकर्त्यांनी सहकार खात्याकडे पाठपुरावा करुन, बँकेचे उपविधी आदि पूर्तता करुन शेवटी २०/१०/१९७३ ला बँकेला रितसर परवाना मिळाला. पुढे ९/११/१९७३ ला भागधारकांची पहिला सभा कल्याण गायन समाजांत प्रा. अशोक प्रधान ह्यांचे अध्यक्षतेखाली होऊन पहिल्या संचालक मंडळाची निवड करण्यात आली. ते ११ जणांचे होते. सभेला सुमारे १०० भागधारक उपस्थित होते.

पुढे बँकेसाठी जागा वगैरे शोधून छोटी १८० चौ. फूट जागा (देवधर सदन, देवीचे देवळाजवळ) मिळाली. भाग भांडवल रु. ५३३००/-, ८० हजाराच्या ठेवी, ३ कर्मचारी ह्यानिशी २३ डिसेंबर १९७३ ला विधान परिषद अध्यक्ष मा. श्री. वि. स. पागे ह्यांचे हस्ते बँकेचे उद्घाटन झाले. प्रकाश टॉकीज येथे जाहीर समारंभ झाला. त्याचे अध्यक्ष बँक ऑफ महाराष्ट्रचे अध्यक्ष मा. श्री. चिं. वि. जोग हे होते.

१९७३ ला बँकेच्या स्थापनेच्यावेळी पहिले संचालक मंडळ सामाजिक जाण ठेवून सर्व समावेशक असे निवडण्यात आले होते.

**संचालक मंडळ**

१) कै. भगवानराव प्रल्हाद जोशी
(संस्थापक, अध्यक्ष)
२) डॉ. पद्माकर विष्णू कारखानीस
(उपाध्यक्ष)
३) ॲड. श्रीधर निळकंठ सबनीस
(चिटणीस)
४) प्रा. श्री. वसंत गणेश फडके, (CA)
(व्यवस्थापकीय संचालक) (MD)
५) प्रा. अशोक प्रभाकर प्रधान
६) कै. शरदचंद्र माधव ओक
७) ॲड. उमर सैफान शेख
८) श्री. नारायण धर्माजी भोईर
९) कै. गंगाराम सखाराम कदम
१०) श्री. वसंत हनुमान पुरोहित
११) श्री. वामन दत्तात्रेय साठे

आता बँकेचा कारभार मोठ्या उत्साहात सुरू झाला. छोट्या छोट्या लोकांना छोटी छोटी कर्जे देणे त्यात हातगाडीवाले, फेरीवाले, चर्मकार, बुरुड, कारखान्यात काम करणाऱ्या कामगारांना कामावर जाण्यासाठी सायकली, बचतची सवय लागावी म्हणून दैनंदिन ठेव योजना, छोट्या उद्योजकांना उद्योग सुरू करण्यासाठी मार्गदर्शन केंद्र, अशा रितीने लोकांचा बँकेवरील विश्वास वाढविण्याचा प्रयत्न होत होता.

★ **१९७६ ची निवडणूक १/१२/७६** अशा रितीने म्हणता म्हणता संचालक मंडळाला आपल्या उपविधीप्रमाणे ३ वर्षांनी संचालक मंडळाची निवडणूक १९७६ मध्ये घेण्यात आली. ती बँकेची पहिली निवडणूक, नवीन बँक, बुडालेली कल्याणातील बँकेचा लोकांना बसलेला फटका त्यामुळे ह्या निवडणूकीकडे योग्य ती प्रसिध्दी देऊनसुध्दा कोणी फिरकले नाही. त्यात संचालकांनी कर्ज व तो जामिनदार असता कामा नये हा नियम तरीपण त्यात ॲड. श्री. श्रीनिवास मोडक, सौ. सुनीती सबनीस, श्री. बाबूराव (वसंत) काणे ह्यांचा समावेश झाला तर श्री. शरदचंद्र ओक, ॲड. शेख, ॲड. भाऊराव सबनीस निवृत्त झाले. प्रथमच बँकेनी सौ. सबनीस महिला ह्यांना मानाने संचालकपद दिले असे परिसरातील बँकेत प्रथमच घडले होते.

*अशीही झालेली पहिली बिनविरोध निवडणूक १/१२/७९*

*★निवडणूक १९७९*

पुढे ७९ ला दुसरी निवडणूक आली. त्यावेळी ४७ लाखाच्या ठेवी तर २४०० सभासद होते. ह्यावेळी रितसर निवडणूक समिती गठीत करुन आवश्यक ती पूर्तता करण्यात आली. १/२ जणांनी अर्ज भरले परंतु ते नंतर मागे घेण्यात आले.

ह्या निवडणुकीत नव्याने श्री. राम जोग (बँक अधिकारी), श्रीनिवास फणसे, श्री. डायाभाई ढोकलीया, प्रा. स. वा. गोखले हे नव्याने आले तर ॲड. मोडक, श्री. भगवानराव जोशी, श्री. वसंतराव पुरोहित, श्री. वसंत (बाबूराव) काणे निवृत्त झाले. ***अशी झालेली दुसरी बिनविरोध निवड***

*★बँकेची १९८२ तिसरी निवडणूक १३/१०/८२*

ह्यावेळी काही अर्ज होते परंतु ते मागे घेण्यात आले. निवडणूक समितीही त्यावेळी होती. ह्यावेळी श्री. शरदचंद्र दांडेकर (माजी बँक ऑफ इंडियाचे अधिकारी) श्री. रमाकांत उपाध्याय (इंजिनियर व उद्योजक) हे नव्याने संचालक झाले तर सौ. सबनीस, श्री. राम जोग हे निवृत्त झाले. ***अशीही झालेली बँकेची तिसरी बिनविरोध निवडणूक १३/१०/८२.***

दरम्यानच्या काळात महाराष्ट्र सरकारच्या सहकार खात्यांनी नवीन आदर्श उपविधी १९८४ ला बँकांना लागू केले. त्यामध्ये निवडणूकीची मर्यादा आता ५ वर्षाची झाली. त्यात राखीव जागा दोन होत्या. एक अल्प उत्पन्न गटासाठी व दुसरी अनुसूचित जाती व जमातीसाठी. त्यामुळे बँकेची निवडणूक आता १९८५ ऐवजी १९८७ ला घेण्यात येणार होती.

*★ बँकेची चौथी निवडणूक १८/१०/८७*

ह्या निवडणूकीसाठी मागीलप्रमाणे श्री. नारायणराव मराठे, श्री. देवकुळे, ॲड. कोदारे ह्यांची निवडणूक समिती गठीत केली होती. त्यांनी योग्य ती निवडणूकीसंबंधात काळजी घेतली होती. त्यावेळी बँकेच्या ठेवी सुमारे ११ कोटी तर सभासद सुमारे ७ हजाराच्या वर होते.

आपल्या बँकेची आता १४ वर्षांत बऱ्यापैकी प्रगती झाली होती. रामबाग व कोळसेवाडी शाखा नव्याने काढण्यात आल्या होत्या. बँकेचा आर्थिक क्षेत्रांत बऱ्यापैकी दबदबा कल्याणात निर्माण झाला होता. त्यामुळे ह्या खुर्चीवर आपण बसावे वा संस्था ताब्यात घ्यावी असे काही जणांना वाटणे स्वाभाविक व लोकशाहीला पूरक असे होते. म्हणून शिवसेना नेते श्री. कपोते व श्री. तुषार राजे ह्या मंडळींनी पॅनेल तयार केले होते. ह्याशिवाय स्वतंत्र ही होते म्हणून समोरासमोर बँकेचे धरुन २ पॅनेल अधिक स्वतंत्र असा हा सामना झाला. बँकेच्या पॅनेलमध्ये श्री. अरुण कदम, श्री. मोहन आघारकर, सौ. मंगला देशपांडे (अल्प उत्पन्न राखीव) अशा तिघांचा समावेश झाला तर श्री. गं. स. कदम, श्री. ढोलकीया व श्री. दांडेकर हे निवृत्त झाले.

हळूहळू निवडणूकीला रंग भरू लागला. प्रचाराची राळ उडू लागली. अटीतटीचा निवडणूकीचा रंग भरू लागला. दि. १८/१०/८७ ला मतदान झाले. त्याच दिवशी लगेच कल्याण गायन समाजात मतमोजणी सुरू झाली. बँकेच्या पॅनेलचे नेतृत्व श्री. साठे करीत होते. ते बँकेचे अध्यक्ष होते. २१११ एवढे मतदान सुमारे ३०% एवढे झाले. त्यात श्री. वामनराव साठे, श्री. वसंतराव फडके ह्यांना सर्वाधिक म्हणजे १६११, मते पडली. प्रचंड मतांनी बँकेचे जनता पॅनेल निवडून आले तर काही विरोधकांच्या अनामत रक्कमा जप्त झाल्या. गुलाल उधळून, फटाक्यांच्या माळा लावून विजय लोकांनी साजरा केला. ***अशी झाली बँकेची चौथी निवडणूक १२/१०/८७.***

*★ बँकेची पाचवी निवडणूक २/१/९३*

पुन्हा पाच वर्षांनी १९९३ ला बँकेची निवडणूक झाली. काही अर्ज नेहमीप्रमाणे आले परंतु ते मागे घेण्यात आले. निवडणूक समितीही होतीच. ह्यावेळी नव्याने ॲड. कोदारे, प्रा. डॉ. वसंतराव काणे, सौ. प्रतिभा बिवलकर, डॉ. सौ. लीना काटकर (राखीव), श्री. कांचन वाडू **S.T.** (राखीव) ह्यांची निवड संचालक मंडळात झाली तर श्री. वसंतराव फडके, प्रा. स. वा. गोखले, श्री. नारायणराव भोईर हे निवृत्त झाले. ह्या वर्षापासून सहकार खात्याने महिलांसाठी दोन राखीव जागा तर **S.C., S.T.** साठी एक राखीव जागा ठेवण्याचे ठरविले होते. त्यामुळे संचालक मंडळात आता चार राखीव जागा झाल्या होत्या. मंडळाची संख्या १३ झाली होती. ९ सर्वसाधारण व ४ राखीव झाल्या. पूर्वी सर्वसाधारणमध्ये राखीव नसताना सौ. सबनीस ह्यांना घेतले होते तर संस्थापक संचालक म्हणून सुरवातीला श्री. नारायणराव भोईर ह्यांना **S.C.** राखीव म्हणून घेतले होते. महिला **S.C./S. T.** राखीव असावे हे सहकार खात्याला फार उशीरा लक्षात आले. आपण ते आधीपासूनच सुरू केले होते. सामाजिक समरसता पहिल्यापासून आपण अंगीकारली होती.

*★बँकेची सहावी निवडणूक ५/७/९८*

पुन्हा ५ वर्षांनी बँकेची निवडणूक झाली. ह्यावेळी पुन्हा काही इच्छुक होते त्यातील काही जणांनी माघार घेतली मात्र सर्वसाधारणमधून श्री. सांगदोरे व राखीव **S.C./S. T.** मधून श्री. वाळंज ह्यांनी निवडणूक लढवायचे ठरविले त्यामुळे फक्त २ जागांसाठी निवडणूक घ्यावी लागणार होती. राखीव महिला व अल्प

उत्पन्नमधून बिनविरोध निवडणूक झाली. अर्थात लोकशाही मजबूत करण्यासाठी हे आवश्यक आहे तर बँक तावून सुलाखून निघावी हे पण तितकेच आवश्यक वाटते.

ह्यावेळी १०१ कोटी ठेवी तर सुमारे १३ हजार सभासद संख्या होती. ह्यावेळी प्रा. अशोक प्रधान हे यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठाचे उपकुलगुरु झाल्यामुळे निवृत्त झाले. सौ. मंगला देशपांडे (राखीव), श्री. वाडू (राखीव) निवृत्त झाले. सौ. सुनिता वझे (अल्प उत्पन्न) राखीव मधून बिनविरोध आल्या. नव्यानी संचालक म्हणून ॲड. श्री. बुधकर, श्री. गांगुर्डे सर (राखीव **S.C.**) व श्री. प्रभाकर वंजारी आले.

निवडणूक तशी लुटूपुटुचीच झाली. मतदान २४५८ म्हणजे सुमारे १९% झाले. ह्यावेळी निवडणूक जिल्हाधिकारी घेणार असल्यामुळे त्याचे केंद्र मामलेदार कचेरी हे होते. त्यामुळे मतमोजणी ६/७/९८ ला मामलेदार कचेरीतच झाली. बँकेचे पॅनेल प्रचंड मतांनी निवडून आले. लोकांनी आनंद व्यक्त करुन बँकेच्या मु. कार्यालयापर्यंत मिरवणूक काढली.

अकरा वर्षांनी बँकेला पुन्हा एकदा निवडणूकीला सामोरे जावे लागले. ***गेल्या शतकातील सहावी निवडणूक ५/७/९८***

***★बँकेची सातवी निवडणूक***

***१५/७/२००३***

ह्या शतकात पुढे पुन्हा निवडणूकीला २००३ ला बँकेला सामोरे जावे लागले. ३/६/२००३ ला घोषणा झाली. पुन्हा हौसे गवसे, "आयलो तर आयलो नाहीतर भिंतीवर राहयलो" अशा काहींनी प्रयत्न केले. संघटीत असे कोणीही पुढे आले नाही. १९९८ ची निवडणूक लोकांना माहित होती. सर्व मित्रांनी व काही जाणत्या मंडळींनी समजूत काढल्यामुळे अर्ज मागे घेण्यात आले. ह्यावेळी बँकेने सौ. पुष्पा कदम, प्रा. सौ. सुषमा फडके, श्री. शरद वाडेकर (वाडा), प्रा. विलास पेणकर, प्रा. प्रधान, ॲड. सुरेश पटवर्धन पाच जणांना सामील केले. (प्रा. श्री. पेणकर हे १९८७ निवडणूकीत स्वतंत्र उभे होते.) तर डॉ. कारखानीस, श्री. अरुण कदम, सौ. बिवलकर, सौ. काटकर हे संचालक निवृत्त झाले. अशा रीतीने ही ***बँकेची सातवी निवडणूक बिनविरोध झाली.***

***★बँकेची आठवी निवडणूक***

***२८/८/२००८***

पुन्हा पाच वर्षांनी निवडणूकीचे वारे वाहू लागले. अजून १९९८ ची आठवण लोकांना होती. काहींनी अर्ज भरले पण ते मागेही घेण्यात आले त्यामुळे निवडणूक बिनविरोध झाली.

नव्याने श्री. हेमल रवाणी, श्री. रमेश गोरे, **(OBC)**, डॉ. श्री. कुमावत **(N.T.)**, श्री. अनिरुध्द जाधव **(S.C.)**, श्री. मधुसूदन पाटील (अल्प उत्पन्न) तर प्रा. अशोक प्रधान, श्री. वामन साठे. श्री. गांगुर्डे सर **(S.C.)**, सौ. सुनिता वझे, श्री. प्रभाकर वंजारी हे निवृत्त झाले. ***अशा रितीने बँकेची ८ वी निवडणूक बिनविरोध झाली. २७/८/२००८***

***★बँकेची नववी निवडणूक***

***३१/५/२०१५***

परत पाच वर्षे झाली. निवडणूकीचे वारे वाहू लागले. वैयकिक्त राग, द्वेश असूया, असंतोषी आत्मे ह्यांची कोल्हेकुई आधीपासूनच कानावर येत होती. उघडपणे तशी काही मंडळी बोलत होती, त्यामुळे यंदा निवडणूकीला सामोरे जावे लागेल ह्याची कल्पना आली होती. कारण १९९८ च्या दणक्याला १७ वर्षे झाली होती आणि त्याला सामोरे जाण्याची तयारी सर्वांनीच केली होती.

मध्यंतरी केंद्र सरकारनी ९७ वी घटना दुरुस्ती करुन बरीच बंधने आणली होती. त्यात उमेदवारासाठी भागभांडवल १५००० पर्यंत आवश्यक, ठेवी १ लाखापर्यंत कारण ठेवीदारांना संरक्षण ह्यामध्ये ठेवण्याचा हेतू होता. बँकेने नव्याने हे सर्व स्विकारून सर्वसाधारण सभेत उपविधी मंजूर करुन घेतले होते व त्याला खात्याची मंजूरीही मिळाली होती.

विरोधी बरेच अर्ज होते परंतु अज्ञानामुळे त्यांचे अर्ज नामंजूर होऊन शेवटी ३ सर्वसाधारण व २ महिला अशी लढत झाली. १९८७ ची सर त्याला नव्हती. तरीपण विरोधकांनी पत्रकबाजी करुन उगाचच धुरळा उडविण्याचा प्रयत्न केला. विरोधक माझ्याकडे आशिर्वाद मागण्यासाठी आले असता प्रचाराची पातळी खाली आणू नका असे सुचविले होते. ते त्यांनी मान्यही केले होते.

निवडणूकीपूर्वीच विरोधकांनी, नावाने, बिननावाने पत्रकबाजी गलीच्छपणे सुरू केले होती. ती पोस्टाने पाठवली. त्यामुळे पोस्टाचा मात्र फायदा झाला. त्याने समाधान झाले नाही म्हणून कोणा विद्वानाला हाताशी धरून त्यांचेमार्फत पत्रकबाजी नव्याने सुरू झाली. त्यालाही त्याचा लिखाणाचा कंडू शमवायचा होताच. त्यांनी त्यांच्या खांद्यावर बंदूक ठेवून अंदाधुंद पत्रकबाजी सुरू केली त्यात चारित्र्य हनन, टिका, बेजबाबदारपणे विषयाला धरून नसलेली विधाने केली. आपला वैयक्तिक असंतोषही प्रकट केला. बंदूकीच्या भाराने विरोधकांचे खांदे मोडले. जनमानसात पत्रकबाजीचा वाईट परिणाम झाला. त्याचा परिणाम मतदानावर होऊन शेवटी व्हायचे तेच झाले. त्यांना दणदणीत पराभव पहावयास मिळाला. पाचही विरोधकांची मते एकत्र केली तरी पॅनेलच्या शेवटच्या उमेदवाराइतकी सुध्दा झाले नाहीत.

३३१४९ मतदारांपैकी ४७८८ (१४.४४%) एवढे फक्त मतदान झाले. जनता पॅनेलचे नेते व बँकेचे अध्यक्ष मा. श्री. मोहन आघारकर ह्यांना ४३३१ एवढी प्रथम क्रमांकाची मते पडली. शेवटी विरोधकांची केविलवाणी परिस्थिती झाली. एकूण निवडणूकीचा बार फुसका ठरला. ***अशी झाली बँकेची नववी निवडणूक ३१/५/२०१५***

गेल्या ४२ वर्षात बँकेच्या एकूण ९ निवडणूका झाल्या. त्यात ६ निवडणूका बिनविरोध तर ३ वेळा बँकेला प्रत्यक्ष निवडणूकीला सामोरे जावे लागले. ह्या सर्वाचा आढावा नवीन सभासदांसाठी विशेषतः तरुणांसाठी घेण्याचा हा प्रयत्न आहे. बँकेच्या निवडणूकीत संचालकांची निवड पहिल्यापासून स्वतंत्रपणे कांही बाहेरची मंडळी करीत असतात. त्यामध्ये प्रत्येक वेळी बदल होऊन नवीन मंडळींना संधी देणे ह्याचे पालन ही निवड समिती कटाक्षाने करीत असते. प्रत्येक वेळी, जुने-नवे असे संचालक पहावयास मिळतात. ह्या वर्षीतर १५ पैकी ७ नवीन चेहरे आपणास संचालक मंडळात पहावयास मिळाले आहेत. सामान्यतः आर्थिक संस्थेत अशा तऱ्हेचा बदल हा धाडसाचा आहे. त्यामुळे ह्यापुढे ज्येष्ठ संचालक आहेत त्यांची जबाबदारी वाढणार आहे.

गेल्या ४२ वर्षांत निवडून आलेले ४९ संचालक पहावयास मिळतात. ह्याशिवाय रिझर्व्ह बँकेच्या आदेशांनी तज्ञ संचालक स्वीकृत करावे लागतात तसे ४ तज्ञ संचालक मिळून ५३ संचालक आजपर्यंत झाले. अशी परिस्थिती अन्यत्र पहावयास बँकातून मिळत नाही. घराणेशाही, गटबाजी इतरत्र पहावयास मिळते.

ह्या ४२ वर्षांत अनेक संचालकांना अध्यक्ष, उपाध्यक्ष पदे विभूषित करण्यास संधी मिळाली आहे. दरवर्षी बदल बँक कटाक्षाने करीत असते.

आजपर्यंत बँकेची झालेली प्रगती आपण पहात आहोतच. मी सुरूवातीला कल्याणकरांनी हे शिवधनुष्य उचलण्याचा प्रयत्न १९७३ साली केला असे लिहिले आहे. त्याला आता ४२ वर्षे झाली. शिवधनुष्य तर आपण यशस्वीरित्या उचलले आहेच शिवाय पदरात घेतलेला निखाराही विजून दिला नाही तर पदरही सुरक्षित ठेवला आहे. त्यात आपण सर्वजण यशस्वी झालो आहोत.

बँकेच्या प्रगतीचा आलेख दरवर्षीच्या वार्षिक अहवालात आपण पहात आहोच. ठेवी, कर्जे ह्यांत मोठ्या प्रमाणात होणारी वाढ, स्वतःच्या इमारती, सातत्याने बँकेला मिळणार अ वर्ग, सुमारे ३२०० कोटींचा एकत्रित व्यवहार हे सर्व अभिमान वाटावे असे आहे.

बँकेचे सर्व भागधारक, खातेदार, ठेवीदार, हितचिंतक, बँकेचे संचालक मंडळ, अधिकारी, कर्मचारी ह्यांचा सिंहाचा वाटा आहे. ते सर्व अभिनंदनास पात्र आहेत. अशीच उत्तरोत्तर बँकेची प्रगती होवो ही प्रार्थना.

धन्यवाद !

लेखामध्ये काही चुक भूल झाली असल्यास क्षमस्व ! ●

## दि कल्याण जनता सहकारी बँक लि. (शेड्युल्ड बँक)

(स्थापना १९७३)

## आजी - माजी संचालक मंडळ

१) कै. भगवानराव प्रल्हाद जोशी (संस्थापक, अध्यक्ष)
२) डॉ. पद्माकर विष्णू कारखानीस (उपाध्यक्ष)
३) ॲड. श्रीधर निळकंठ सबनीस (चिटणीस)
४) प्रा. श्री. वसंत गणेश फडके, (CA) (व्यवस्थापकीय संचालक) (MD)
५) प्रा. अशोक प्रभाकर प्रधान
६) कै. शरदचंद्र माधव ओक
७) ॲड. उमर सैफान शेख
८) श्री. नारायण धर्माजी भोईर
९) कै. गंगाराम सखाराम कदम
१०) श्री. वसंत हनुमान पुरोहित
११) श्री. वामन दत्तात्रेय साठे
१२) कै. वसंत रामचंद्र काणे
१३) ॲड. श्रीनिवास चिंतामण मोडक
१४) सौ. सुनिती श्रीधर सबनीस
१५) श्री. राम दत्तात्रय जोग
१६) श्री. श्रीनिवास त्रिंबक फणसे
१७) श्री. डाह्यालाल लक्ष्मण ढोलकीया
१८) कै. प्रा. सदाशिव वामन गोखले
१९) कै. शरदचंद्र गणेश दांडेकर
२०) श्री. लक्ष्मीकांत श्रीधर उपाध्याय
२१) श्री. मोहन श्रीराम आघारकर
२२) श्री. अरुण दत्तात्रय कदम
२३) सौ. मंगला कल्याणराव देशपांडे
२४) कै. ॲड. दत्ताराम दौलत कोदारे
२५) प्रा. (डॉ.) वसंत दत्तात्रय काणे
२६) सौ. प्रतिभा विश्वनाथ बिवलकर
२७) डॉ. सौ. लीना ललित काटकर
२८) कै. कांचन रामजी वाडू
२९) ॲड. निशिकांत पु. बुधकर
३०) श्री. शंकर नाना गांगुर्डे
३१) सौ. सुनिता सुधीर वझे
३२) श्री. प्रभाकर सोनु वंजारी
३३) सौ. पुष्पा अर्जुन कदम
३४) प्रा. सौ. सुषमा सुनील फडके
३५) श्री. शरद हरिश्चंद्र वाडेकर
३६) प्रा. विलास महादेव पेणकर
३७) ॲड. सुरेश वामन पटवर्धन
३८) श्री. हेमल शांतीलाल रवाणी
३९) श्री. रमेश पुंडलिक गोरे
४०) डॉ. श्री. बळीराम गं. कुमावत
४१) श्री. अनिरुध्द सूर्यभान जाधव
४२) श्री. मधुसूदन रामदास पाटील
४३) श्री. दिलीप मधुकर दळवी
४४) श्री. हेमंत सुदाम दरगोडे
४५) डॉ. संदिप दत्तात्रय जाधव
४६) श्री. पद्मनाभ जयंत जोशी
४७) श्री. मिलिंद शंकर नाईक
४८) डॉ. रत्नाकर नारायण फाटक
४९) सौ. माधुरी विनायक वझे
५०) श्री. प्रदीप मधुकर दळवी (स्वीकृत संचालक)
५१) श्री. दीपक वसंत नामजोशी (स्वीकृत संचालक)
५२) श्री. सचिन सुधाकर आंबेकर (स्वीकृत संचालक)
५३) श्री. विजय द. चिपळूणकर (स्वीकृत संचालक)